ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एकरकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे अशा कर्मचाऱ्यांबाबतीत पुनःस्थापित करण्यात आलेला निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग सुधारित करणेबाबतचे आदेश

18 DEC 1999

२०५

ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्थांमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे अशा कर्मचाऱ्यांबाबतीत पुनःस्थापित करण्यात आलेला निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग सुधारित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक निअंक १०९९/३०६/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ नोव्हेंबर १९९९.

पहा : शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक-१०९७/१२/सेवा-४, दिनांक २६ मे १९९७

निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १०९७/१२/सेवा-४, दिनांक २६ मे १९९७ च्या तरतुदीनुसार ज्या शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, असे कर्मचारी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक-१०८६/१७७१/सेवा-४, दिनांक ३० मे १९८८ मधील तरतुदीनुसार, अंशराशीकरण केल्याच्या दिनांकापासून १५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर किंवा दिनांक १ एप्रिल १९८५ यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यास पात्र ठरले आहेत. हे आदेश निर्गमित झाल्यानंतर विविध विभाग/निवृत्तिवेतनधारकांच्या संघटना इत्यादींकडून, पुनःस्थापित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाच्या १/३ इतक्या अंशराशीकृत भागाच्या रकमेमध्ये सुधारणा, पुनःस्थापित करण्यात आलेल्या रकमेवर महागाई वाढ/अंतरिम वाढ, किमान निवृत्तिवेतनाचे प्रदान इत्यादींबाबत अनेक स्पष्टीकरणांची मागणी करण्यात आली होती. या सर्व मुद्याचे परिक्षण करून शासन आता असा निर्णय घेत आहे की, एक रकमी ठोक रक्कम स्वीकारून समावेशन झालेल्या कर्मचाऱ्यांची, पुनःस्थापित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाच्या १/३ इतक्या भागाच्या रकमेत सुधारणा करणे इत्यादींबाबतची प्रकरणे खालीलप्रमाणे विनियमित करण्यात येतील.

(एक) जेथे सरकारी क्षेत्रांतील उपक्रम/स्वायत्त संस्थांमधील कायमचे समावेशन दिनांक ३१ मार्च १९७९ पूर्वी झालेले असेल अशा प्रकरणी पुनःस्थापित केलेल्या निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग सुधारित करणेबाबत.

(ए) अशा प्रकरणी, समावेशनाच्यावेळी मंजूर करण्यात आलेले मूळ निवृत्तिवेतन, हे प्रथमतः १९७९ च्या निवृत्तिवेतनाच्या सुधारित सूत्रानुसार काल्पनिकरित्या सुधारण्यात यावे. त्यासाठी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीईएन-१०८४/प्र.क्र २६/सेवा-४, दिनांक १ जून १९८४ अन्वये विहित करण्यात आलेल्या शीघ्रगणकाचा उपयोग करण्यात यावा. मूळ निवृत्तिवेतनात काल्पनिकरित्या सुधारणा केल्यानंतर, अशा निवृत्तिवेतनाचा १/३ भाग परिगणित करून, अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षांनंतर किंवा दिनांक १ एप्रिल १९८५ यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून पुनःस्थापित करण्यात यावा. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी मार्गदर्शनासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याच्या **जोडपत्र-१ मधील तक्ता-१** पहावा.

(बी) मूळ निवृत्तिवेतनामध्ये वरील (ए) प्रमाणे काल्पनिकरित्या सुधारणा करण्यात आल्यानंतर त्याचे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेआशी-१०८७/४२६/सेवा-१०, दिनांक १९ ऑगस्ट १९८७ मधील आदेशानुसार आणखी काल्पनिकरित्या सूत्रीकरण करण्यात यावे, आणि त्यासाठी त्यामध्ये विहित करण्यात आलेल्या तक्त्याचा वापर करण्यात यावा. आणि तो वरील (ए) येथे काढलेल्या रकमेऐवजी दिनांक १ जानेवारी १९८६ किंवा अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षे यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून देय राहील. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी मार्गदर्शनासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याच्या **जोडपत्र-१ मधील तक्ता-२** पहावा.

(सी) मूळ निवृत्तिवेतनामध्ये वरील (ए) व (बी) प्रमाणे काल्पनिकरित्या सुधारणा आणि त्याचे एकत्रीकरण करण्यात आल्यानंतर ते शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ मधील आदेशानुसार आणखी काल्पनिकरित्या सुधारण्यात यावे, आणि त्यासाठी त्यामध्ये विहित करण्यात आलेल्या शीघ्रगणकाचा उपयोग करण्यात यावा. काल्पनिक मूळ निवृत्तिवेतन अशाप्रकार परिगणित केल्यानंतर अशा निवृत्तिवेतनाचा १/३ भाग काढण्यात यावा आणि तो वरील (बी) येथे काढलेल्या रकमेऐवजी दिनांक १ जानेवारी १९९६ पासून किंवा अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षे यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून देय राहील. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी मार्गदर्शनासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याच्या **जोडपत्र-१ मधील तक्ता-३** पहावा.

(दोन) जेथे सरकारी क्षेत्रांतील उपक्रम/स्वायत्त संस्थामधील कायमचे समावेशन दिनांक १ एप्रिल १९७९ रोजी किंवा त्यानंतर, परंतु दिनांक १ जानेवारी १९८६ पूर्वी झालेले असेल अशा प्रकरणी पुनःस्थापित केलेल्या निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग सुधारित करणेबाबत.

(ए) समावेशनाच्यावेळी मंजूर करण्यात आलेले मूळ निवृत्तिवेतन हे, प्रथमत: शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेआशी-१०८७/४२६/सेवा-१०, दिनांक १९ ऑगस्ट १९८७ मधील आदेशानुसार काल्पनिकरित्या सुधारण्यात यावे, आणि त्यासाठी त्यामध्ये विहित करण्यात आलेल्या तक्त्याचा उपयोग करण्यात यावा. त्यानंतर अशा निवृत्तिवेतनाचा १/३ भाग काढण्यात यावा, आणि तो, अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षानंतर किंवा दिनांक १ जानेवारी १९८६ यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून पुनःस्थापित करण्यात यावा. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी मार्गदर्शनासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याच्या **जोडपत्र-१ मधील तक्ता-२** पहावा.

(बी) मूळ निवृत्तिवेतनामध्ये वरील (ए) प्रमाणे काल्पनिकरित्या सुधारणा करण्यात आल्यानंतर ते शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सेनिवे १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ मधील आदेशानुसार, दिनांक १ जानेवारी १९९६ पासून आणखी काल्पनिकरित्या सुधारण्यात यावे, आणि त्यासाठी त्यामध्ये विहित करण्यात आलेल्या शीघ्रगणकाचा उपयोग करण्यात यावा. त्यानंतर अशा निवृत्तिवेतनाचा १/३ भाग काढण्यात यावा आणि तो वरील (ए) येथे काढलेल्या रकमेऐवजी दिनांक १ जानेवारी १९९६ पासून किंवा अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षे, यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून देय राहील. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी मार्गदर्शनासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याच्या **जोडपत्र-१ मधील तक्ता-३** पहावा.

(तीन) जेथे सरकारी क्षेत्रांतील उपक्रम/स्वायत्त संस्थांमधील कायमचे समावेशन दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु दिनांक ३१ मार्च १९९५ पूर्वी झालेले असेल अशा प्रकरणी पुनःस्थापित केलेल्या निवृत्तिवेतनाचा १/३ इतका, अंशराशीकृत भाग सुधारित करणेबाबत.

समावेशनाच्यावेळी मंजूर करण्यात आलेले मूळ निवृत्तिवेतन, हे शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सेनिवे १०९९/३०३/सेवा-४ दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ मधील आदेशानुसार काल्पनिकरित्या सुधारण्यात यावे आणि त्यासाठी विहित करण्यात आलेल्या शीघ्रगणकाचा उपयोग करण्यात यावा. त्यानंतर अशा निवृत्तिवेतनाचा १/३ भाग काढण्यात यावा, आणि तो अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षानंतर किंवा दिनांक १ जानेवारी १९९६ यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून पुनःस्थापित करण्यात यावा. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी मार्गदर्शनासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याच्या **जोडपत्र-१ मधील तक्ता-३** पहावा.

(चार) १९८६ पूर्वी समावेशन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पुनःस्थापित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे १०९९/३०४/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ च्या आदेशातील तरतुदीनुसार सुधारित करणेबाबत.

(ए) वरील **(एक)** व **(दोन)** येथे सूचविलेली कार्यवाही पूर्ण केल्यानंतर १९८६ पूर्वी समावेशन झालेल्या कर्मचाऱ्यांचे मूळ निवृत्तिवेतन शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३०४/सेवा ४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ मधील आदेशानुसार काल्पनिकरित्या सुधारण्यात यावे, आणि त्याचा १/३ भाग काढण्यात यावा आणि तो वरील (एक) व (दोन) येथे आलेल्या रकमेऐवजी दिनांक १ जानेवारी १९९६ पासून किंवा अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षे यापैकी जो नंतरचा दिनांक असेल तेव्हापासून देय राहील.

(बी) ज्या प्रकरणी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३०४/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ ची अंमलबजावणी करण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे, अशा प्रकरणी समावेशित कर्मचाऱ्यांना तात्काळ अर्थसहाय्य देता येणे शक्य व्हावे यासाठी वरील (एक) (सी) व (दोन) (बी) यात तरतूद केल्याप्रमाणे निवृत्तिवेतनात सुधारणा करणे आवश्यक राहील. अशा प्रकरणी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालये यांनी वरील (एक) आणि (दोन) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पुनःस्थापित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाच्या १/३ इतक्या अंशराशीकृत भागामध्ये सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी आणि, असल्यास, थकबाकीची रक्कम तसेच निवृत्तिवेतनाच्या १/३ इतक्या अंशराशीकृत भागाची सुधारित रक्कम समावेशित कर्मचाऱ्यांना तात्काळ वितरित करावी. त्यानंतर आणखी विलंब न करता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-१०९९/३०४/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ मधील निदेशांची अंमलबजावणी करावी.

२. इतर राज्यशासकीय निवृत्तिवेतनधारकांना वेळोवेळी ज्या दराने महागाई वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहे, त्याच दराने, पुनःस्थापित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाच्या १/३ इतक्या अंशराशीकृत भागावर महागाई वाढ अनुज्ञेय राहील. शासनाने त्यांच्या निवृत्तिवेतनधारकांना दिनांक १ एप्रिल १९८५ ते दिनांक १ जानेवारी १९९९ या कालावधीत ज्या दराने महागाई वाढ वितरित केलेली आहे ते दर **जोडपत्र-२** मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

३. समावेशित कर्मचारी राज्य शासन किंवा केंद्र शासन किंवा त्यांच्या अंतर्गत भारतातील किंवा परदेशातील महामंडळ/कंपनी/संस्था/बँक यामध्ये पुनर्नियुक्त/नियुक्त झालेला नव्हता (यात पुनःस्थापनेच्या वेळी अशा महामंडळ/कंपनी/संस्था/बँक मधील कायमच्या समावेशनाचाही अंतर्भाव आहे), या शर्तीच्या अधीन राहून पुनःस्थापित रकमेवर महागाई वाढीचे प्रदान करण्यात येईल.

४. आणखी असा निर्णय घेण्यात आला आहे की, राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारकांना ज्या दराने अंतरिम वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहे, त्याच दराने समावेशित कर्मचारी दिनांक १ एप्रिल १९९५ पासून अंतरिम वाढ-१ व २ ची थकबाकी घेण्यास पात्र राहतील, म्हणजेच—

अंतरिम वाढ—१ : दिनांक १ एप्रिल १९९५ पासून दरमहा रुपये ५०.००

अंतरिम वाढ—२ : दिनांक १ एप्रिल १९९५ पासून निवृत्तिवेतनाच्या १/३ अंशराशीकृत भागाइतक्या पुनःस्थापित रकमेच्या १० टक्के किंवा रु. ५० यापैकी जी रक्कम अधिक असेल ती रक्कम.

५. समावेशित कर्मचारी, दिनांक १ एप्रिल १९९५ रोजी निवृत्तिवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यास पात्र झाला असेल तर त्यास अंतरिम वाढीची थकबाकी देय राहील. जेथे निवृत्तिवेतनाच्या १/३ इतक्या अंशराशीकृत भागाची पुनःस्थापना दिनांक १ एप्रिल १९९५ ते ३१ डिसेंबर १९९५ या कालावधीत देय झाली असेल तेथे संबंधित कालावधीपुरतीच अंतरिम वाढीची थकबाकी अनुज्ञेय राहील. समावेशित कर्मचारी राज्य किंवा केंद्र शासन किंवा त्यांच्या अंतर्गत भारतातील किंवा परदेशातील महामंडळ/कंपनी/संस्था/बँक यामध्ये पुनर्नियुक्त/नियुक्त झालेला नव्हता, (यात अशा महामंडळ/कंपनी/संस्था/बँक मधील कायमच्या समावेशनाचाही अंतर्भाव आहे) या आणखी शर्तीच्या अधीन राहून अंतरिम वाढीचे प्रदान करण्यात येईल. अंतरिम वाढ ही स्वतंत्र घटक म्हणून दर्शविण्यात येईल व या घटकावर महागाई वाढ अनुज्ञेय राहणार नाही.

६. निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग ज्या दिनांकास पुनःस्थापित झाला असेल, त्या दिनांकापासून, १/३ अंशराशीकृत भागाच्या पुनःस्थापित रकमेत सुधारणा करण्याबाबतचा लाभ अनुज्ञेय राहील.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील कुटुंब निवृत्तिवेतनाचे लाभ देण्यासंबंधात असे स्पष्ट करण्यात येते की, जेथे सरकारी क्षेत्रातील उपक्रम/स्वायत्त संस्था यामधील समावेशित राज्य शासकीय कर्मचारी (समावेशनाच्या वैयक्तिक प्रकरणी) सरकारी क्षेत्रातील उपक्रम/स्वायत्त संस्था यामधून शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे-१०९०/प्र.क्र. १४६/सेवा-३, दिनांक ३१ मे १९९४ निर्गमित होण्यापूर्वी सेवानिवृत्त झाले होते, अशी प्रकरणे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीईएन १०८०/प्र.क्र. २१०/सेवा-४, दिनांक २८ एप्रिल १९८१ मधील सूचनांनुसार तपासणे आवश्यक आहे. वेगळ्या शब्दात सांगावयाचे तर, समावेशित कर्मचाऱ्यास, जर सरकारी क्षेत्रातील उपक्रमाची ईपीएफ व मिसलेनियस प्रोव्हीजन्स ॲक्ट, १९५२ अंतर्गत तयार करण्यात आलेली कुटुंब निवृत्तिवेतन योजना अनिवार्यपणे लागू ठरत नसेल किंवा नियमानुसार विहित केलेल्या तरतुदीपेक्षा अधिक वेतन घेत असल्याने, तो, सरकारी क्षेत्रातील उपक्रमाच्या कुटुंब निवृत्तिवेतन योजनेचा सदस्य बनण्यास पात्र ठरला नसेल तरच त्यास राज्य शासनाच्या नियमानुसार कुटुंब निवृत्तिवेतनाचा लाभ देण्याबाबतचा प्रश्न उद्‌भवेल. शासन निर्णय, वित्त विभाग

क्रमांक पीईएन-१०८०/प्र.क्र. २१०/सेवा-४, दिनांक २८ एप्रिल १९८५ मधील सूचनांना अनुसरुन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालय यांनी प्रत्येक प्रकरणाची तपासणी करुन कागदपत्रे, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांना निवृत्तिवेतन प्रदान आदेशाद्वारे कुटुंब निवृत्तिवेतन प्राधिकृत करण्यासाठी पाठवावी.

८. जेथे समावेशित कर्मचाऱ्याचा मृत्यू निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षानंतर किंवा दिनांक १ एप्रिल १९८५ यापैकी, जो नंतरचा दिनांक असेल त्यानंतर झाला असेल आणि तो निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्याच्या लाभास पात्र ठरला असेल तर त्याचे कुटुंबातील सदस्य/कायदेशिर वारस या आदेशातील तरतुदींनुसार देय ठरणाऱ्या थकबाकीची मागणी करण्यास पात्र राहतील.

९. महालेखापाल, मुंबई/नागपूर यांना विनंती करण्यात येते की, या प्रकरणी प्रदान प्राधिकृत करण्यासाठी निवृत्तिवेतन प्रदान आदेश तयार करताना त्यांनी निवृत्तिवेतन प्रदान आदेशावर " **सरकारी क्षेत्रातील उपक्रम/स्वायत्त संस्था यामधील समावेशित कर्मचारी** " असे उपरिलेखन स्पष्टपणे केले जाईल आणि मूळात मंजूर करण्यात आलेले निवृत्तिवेतनाच्या १/३ भागाचे अंशराशीकृत मुल्य देखील यथोचितरित्या दर्शविण्यात येईल, याची खात्री करावी. यामुळे भविष्यकाळात जेव्हा एखादी सुधारणा/विलीनीकरण केले जाईल तेव्हा ही प्रकरणे ओळखता येतील आणि नियमित निवृत्तिवेतन धारकांच्या प्रकरणांबरोबर ती मिसळली जाणार नाहीत याची खात्री करणे सर्व संबंधितांना शक्य होईल.

१०. समावेशित कर्मचारी समावेशनापूर्वी जेथे काम करीत होता, त्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालये यांनी पुन:स्थापित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाच्या १/३ अंशराशीकृत भागाच्या रकमेत सुधारणा करणे, अशा निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ / अंतरिम वाढ देणे, यामुळे देय झालेल्या थकबाकीची परिगणना करावी आणि नेहमीच्या पद्धतीनुसार म्हणजे अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई व कोषागार अधिकारी यांचेमार्फत त्यांचे प्रदान करणे शक्य व्हावे यासाठी निवृत्तिवेतनाचे कागदपत्र, यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडे आवश्यक ती मंजूरी देण्यासाठी पाठवावे. समावेशित कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः निअंक १०९७/१२/सेवा-४, दिनांक २६ मे १९९७ च्या आधारे थकबाकी यापूर्वीच प्रदान करण्यात आली असल्यास, या आदेशाद्वारे प्रदान करताना ती वसूल / समायोजित केली जाईल याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग / कार्यालये यांची राहील. पुनःस्थापित निवृत्तिवेतनाच्या १/३ अंशराशीकृत भागाच्या रकमेवर शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील. समावेशित कर्मचाऱ्यांच्या ज्या प्रकरणी पुन:स्थापित निवृत्तिवेतनाच्या १/३ भागाची रक्कम महागाई वाढीच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या कमीतकमी निवृत्तिवेतनापेक्षा कमी असेल त्या प्रकरणी या विभागाने वेळोवेळी विहित केलेला महागाई वाढीचा तक्ता लागू होणार नाही.

११. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - पीईएन- १०८४/प्र.क्र. २६/सेवा-४, दिनांक १ जून, १९८४ मधील परिच्छेद-४, व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेआसी १०८७/४२६/सेवा-१०, दिनांक १९ ऑगस्ट, १९८७ मधील परिच्छेद १० (ए), यामधील तरतूदी या आदेशात निर्देशित केलेल्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

१२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

१३. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे. वरील परिच्छेद-८ मध्ये नमूद केलेली **जोडपत्र-१ व जोडपत्र-२** ही इंग्रजी प्रतीसोबत जोडल्याप्रमाणे असतील

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसन्त वा. चौधरी,
शासनाचे उपसचिव.

Revision of the restored amount of one-third commuted portion of pension in respect of the State Government employees who had drawn lumpsum amount on their absorption in a Public Sector Undertaking/Autonomous Body/ Local Body.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

FINANCE DEPARTMENT

Resolution No. COP-1099/306/SER 4,
Mantralaya, Mumbai-400 032, dated 15th November 1999.

Read :—Government Resolution, Finance Department, No. COP-1097/12/SER 4, dated 26th May 1997.

RESOLUTION

In accordance with the provisions contained in Government Resolution, Finance Department, No. COP-1097/12/SER-4, dated 26th May 1997, the State Government servants who had drawn lumpsum amount on absorption in a PSU/Autonomous body have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as per the provisions of Government Resolution, Finance Department, No. COP-1086/1771/SER-4, dated 30th May 1988, after 15 years from the date of commutation or 1-4-1985, whichever is later. After issue of this resolution, a number of clarifications had been sought by various Departments/Pensioners' Associations etc. on revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension, dearness relief/interim relief on the restored amount, payment of minimum pension etc. All these issues were examined and the Government is now pleased to decide that the cases of absorbed employees (i.e. who had drawn lumpsum amount on absorption) for revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension etc. shall be regulated as under :

(I) Revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension, where permanent absorption in the PSU/Autonomous body had taken place prior to 31st March 1979.

(*a*) In such cases, the basic pension that was sanctioned at the time of absorption should be first notionally revised as per the Liberalised Pension Formula of 1979. For this purpose, the Ready Reckoner prescribed under Government Resolution, Finance Department, No. PEN-1084/CR-26/SER-4, dated 1st June 1984 should be made use of. After the basic pension has been notionally revised, 1/3rd portion of such pension should be worked out and restored after 15 years from the date of commutation or 1-4-1985, whichever is later. Administrative Departments in Mantralaya/Offices may refer to **Table-I of Annexure-I** of the enclosed specimen for guidance.

(*b*) The basic pension after having been notionally revised as in (a) above should be further notionally rationalised as per the orders contained in Government Resolution, Finance Department, No. PCR-1087/426/SER-10, dated 19th August 1987 and for this purpose, the Table prescribed thereunder should be made use of. After the revised notional basic pension has been calculated, 1/3rd portion of such pension should be worked out and shall be payable in lieu of the amount arrived at (a) above with effect from 1st January 1986 or 15 years from the date of commutation, whichever is later. Administrative Departments in Mantralaya/ Offices may refer to **Table-II of Annexure-I** of the enclosed specimen for guidance.

(c) The basic pension after having been notionally revised and consolidated as in (*a*) and (*b*) above should be further notionally revised as per orders contained in Government Resolution, Finance Department, No. PEN 1099/303/SER-4, dated 15th November 1999 and for this purpose, the Ready Reckoner prescribed thereunder should be made use of. After the notional basic pension has been so calculated, 1/3rd portion of such pension should be worked out and shall be payable in lieu of the amount arrived at (*b*) above with effect from 1st January 1996 or 15 years from the date of commutation, whichever is later. Administrative Departments in Mantralaya/ Offices may refer to **Table-III of Annexure-I** of the enclosed specimen for guidance.

(II) **Revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension, where permanent absorption in a PSU/Autonomous body has taken place on or after 1st April 1979 but prior to 1st January 1986.**

(*a*) The basic pension that was sanctioned at the time of absorption should be first notionally revised as per the orders contained in Government Resolution, Finance Department, No. PCR-1087/426/SER-10, dated 19th August 1987 and for this purpose, the Table prescribed thereunder should be made use of. Thereafter, 1/3rd portion of such pension should be worked out and restored after 15 years from the date of commutation or 1-1-1986, whichever is later. Administrative Departments in Mantralaya/ Offices may refer to **Table-II of Annexure-I** of the enclosed specimen for guidance.

(*b*) The basic pension after having been notionally revised as in (*a*) above should be further notionally revised with effect from 1st January 1996 as per the orders contained in Government Resolution, Finance Department, No. PEN 1099/303/ SER-4, dated 15th November 1999 and for this purpose the Ready Reckoner prescribed thereunder should be made use of. Thereafter, 1/3 portion of such pension should be worked out and shall be payable in lieu of the amount arrived at (*a*) above with effect from 1-1-1996 or 15 years from the date of commutation, whichever is later. All Administrative Departments in Mantralaya/ Offices may refer to **Table-III of Annexure-I** of the enclosed specimen for guidance.

(III) **Revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension, where permanent absorption in a PSU/Autonomous body has taken place on or after 1st January 1986 but prior to 31st March 1995.**

The basic pension that was sanctioned at the time of absorption should be notionally revised as per the orders contained in Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/303/SER-4, dated 15th November 1999 and for this purpose, the Ready Reckoner prescribed thereunder should be made use of. Thereafter 1/3rd portion of such pension should be worked out and restored after 15 years from the date of commutation or 1-1-1996, whichever is later. Administrative Departments in Mantralaya/ Offices may refer to **Table-III of Annexure-I** of the enclosed specimen for guidance.

(IV) **Revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension of pre-1986 absorbed employees as per the provisions contained in Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/304/SER-4, dated 15th November 1999.**

(*a*) After completion of the exercise suggested in (I) and (II) above, the basic pension of pre-1986 absorbed employees should be further notionally revised as per the orders contained in the Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/304/SER-4, dated 15th November 1999 and its 1/3rd component worked out and shall be payable in lieu of the amount arrived at (I) and (II) above with effect from 1-1-1996 or 15 years from the date of commutation, whichever is later.

(b) Revision of pension in terms of I(c) and II(b) shall be necessary in cases where implementation of the Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/304/SER-4.dated 15th November 1999, is likely to take sometime so that immediate relief could be provided to absorbed employees. In such cases Administrative Departments in Mantralaya/Offices should take immediate action to revise the restored amount of 1/3rd commuted portion of pension as provided in (I) and (II) above and release the arrears, if any, as well as revised amount of 1/3rd commuted portion of pension to the absorbed employees immediately. Thereafter action should be taken to implement the directions contained in the Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/304/SER-4, dated 15th November 1999 without any further delay.

2. Dearness Relief on the restored amount of 1/3rd commuted portion of pension shall be admissible at the same rates at which they have been made admissible to other State Government Pensioners from time to time. The rates at which Dearness Relief has been released by the Government to its pensioners during the period from 1st April 1985 to 1st January 1999 have been indicated in **Annexure-II.**

3. Payment of Dearness Relief on the restored amount is subject to the condition that the absorbed employee was not re-employed/employed under the State Government or Central Government or Corporation/Company/Body/Bank under them in India or abroad, including permanent absorption in such Corporation/Company/Body/Bank at the time of restoration.

4. It has been further decided that the absorbed employees shall be entitled to the payment of arrears on account of Interim Relief-I and II from 1-4-1995 at the same rate at which Interim Relief has been made admissible to State Government Pensioners viz.

I.R.-I ... Rs.50/- per month with effect from 1st April 1995.

I.R.-II ... 10% of the restored amount of 1/3rd commuted portion of pension or Rs.50/-, whichever is more, with effect from 1st April 1995.

5. Arrears on account of I.R. shall be payable provided the absorbed employee has become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as on 1st April 1995. Where the 1/3rd commuted portion of pension became due for restoration during the period from 1st April 1995 to 31st December 1995, arrears on account of I.R. shall be admissible for the relevant period only. Payment of arrears of I.R. is subject to the further condition that the absorbed employee was not re-employed/employed under the State or Central Government or a Corporation/Company/Body/Bank under them in India or abroad, including permanent absorption in such Corporation/Company/Body./Bank. I.R. will be shown as a separate element and no Dearness Relief on this element will be admissible.

6. The benefit of revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension shall be admissible from the date the commuted portion of pension is restored.

7. In so far as extension of family pension benefits under the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 is concerned, it is clarified that wherever a State Government absorbee in a PSU/Autonomous body (in individual cases of absorption) had retired from the service of the PSU/Autonomous body prior to issue of Government Resolution, Finance Department, No. PEN-1090/CR-146/SER-2, dated 31st May 1994, such cases are required to be examined in accordance with the instructions contained in the Government Resolution, Finance Department, No. PEN-1080/CR-210/ SER 4, dated 28th April 1981. In other words, the question of extending family pension benefits under the State Government rules will arise only if the absorbed employee was not compulsorily governed by the family pension scheme of the PSU framed under the EPF & Miscellaneous Provisions Act, 1952 or was not eligible to become a member of the family pension scheme of the PSU because of

his drawing more pay than prescribed under the rules etc. It is for the Administrative Departments in Mantralaya/ Offices to examine each case and to forward the papers to the Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, for authorisation of family pension in the PPO provided the request is covered by the instructions contained in the Government Resolution, Finance Department, No. PEN-1080 /CR-210/SER-4, dated 28th April 1981.

8. Where the death of an absorbee has taken place after 15 years from the date of commutation of pension or 1st April 1985, whichever is later, and he had become entitled to the benefit of restoration of the commuted portion of pension, the family member(s) /legal heir(s) will be eligible to claim the arrears becoming due in accordance with the provisions contained in this order.

9. The Accountant General, Mumbai/Nagpur are requested to ensure that at the time of preparing PPOs in these cases for authorisation of payment, they should clearly superscribe the PPOs as **'PSU/Autonomous body absorbees'** and also suitably indicate the originally sanctioned 1/3rd commuted value of pension. This will enable all concerned, whenever any revision/merger takes place in future, to identify these cases and ensure that they do not get merged with regular pensioners.

10. The Administrative Departments in Mantralaya/ Offices, where the absorbed employee was employed prior to absorption, will have to work out the arrears payable on account of revision of the restored amount of 1/3rd commuted portion of pension, Dearness Relief/ Interim Relief on such pension and forward the pension papers to Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, for issue of necessary sanction through the normal channel viz. Pay & Accounts Officer, Mumbai/ Treasury Officers for its payment. It will also be the responsibility of the Administrative Departments in Mantralaya/ Offices to ensure that arrears, if any, already paid to the absorbed employee based on Government Resolution, Finance Department, No. COP-1097/12/SER-4, dated 26th May 1997 are recovered/adjusted while making payment under these orders. The payment of dearness relief on the restored amount of 1/3rd commuted value of pension will be admissible at the rate prescribed by the Government from time to time. The Dearness Relief table prescribed by this Department from time to time will not be applicable in the case of absorbed employees whose restored amount of 1/3rd commuted portion of pension under these orders happens to be less than the minimum amount of pension indicated in the Dearness Relief table.

11. The provisions contained in para 4 of Government Resolution, Finance Department, No. PEN-1084/CR-26/SER-4, dated 1st June 1984 and para 10(a) of Government Resolution, Finance Department, No. PCR-1087/426/SER-10, dated 19th August 1987, shall be deemed to have been modified to the extent indicated in these orders.

12. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decisions apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VASANT W. CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

SPECIMEN

ANNEXURE-I

(As referred to in Para 1 of G. R., F. D., No. COP 1099/306/SER-4, dated 15th Nov. 1999)

TABLE-I

Revision of basic pension as per Liberalised Pension Formula of 1979 for the purpose of working out revised restored amount of 1/3rd commuted portion of pension.

Basic Pension sanctioned to a Government servant on @absorption in a PSU/ Autonomous Body prior to 31st March 1979.	Basic Pension as indicated in Column (1) that would have been admissible as on 1st April 79 as per Government Resolution, Finance Department, No PEN 1084/ CR 26/SER-4, dated 1st June 1984, in case lumpsum amount had not been drawn. (Existing pension as on 1st April 79)	Revised amount of basic pension that would have been admissible with effect from 1st April 1979 as per the Libertised Pension Formula of 1979 and as per the Ready Reckoner prescribed under Government Resolution, Finance Department, No. PEN 1084/ CR 26/SER-4, dated 1st June 1984 in those cases where absorption had taken place during the following period.			One-third commuted portion of revised basic pension indicated in Column 3 to be restored after 15 years from the date of commutation or 1st April 85, whichever is later.		
		1st March 1976 and 30th March 1979	1st January 1975 and 29th February 1976	17th October 1967** and 31st December 1974			
(1)	(2)	(3)(a)	(3)(b)	(3)(c)	(4)(a)	(4)(b)	(4)(c)
25*	41	50	52	52	16	17	17
30	41	50	52	52	16	17	17
40	41	50	52	52	16	17	17
60	60	73	75	75	24	25	25
100	100	122	127	126	40	42	42
102	102	124	129	129	41	43	43
118	118	144	149	148	48	49	49
160	160	194	202	201	64	67	67
250	250	304	316	315	101	105	105
360	360	437	457	455	145	152	151

@ Wherever basic pension sanctioned on absorption happened to be Rs. 40 or less, it should be stepped upto Rs. 41 with effect from 1st April 1979 as per Government Resolution, Finance Department, No. PEN 1084/CR-26/ SER-4, dated 1st June 1984

** The concept of payment of lumpsum amount on absorption in a PSU/ Autonomous Body came into existence with effect from 17th October 1967. Therefore pre-October 1967 period has not been indicated.

SPECIMEN

ANNEXURE-I—*contd.*

TABLE-II

Revision of basic pension with effect from 1st January 1986 for the purpose of working out revised restored amount of 1/3rd commuted portion of pension.

Basic Pension as on 31st December 1985 that would have been admissible as per Liberlised Pension Formula of 1979 (Table I), provided the absorbed employee had not opted for lumpsum payment on absorption (Existing Pension on 31st December 1985)	Further consolidation of Basic Pension indicated in Column (5) w.e.f 1st January 1986 as per Government Resolution, Finance Department, No. PCR 1087/426/SER-10, 19th August 1987 in respect of pensioners covered by				1/3rd commuted portion of revised Basic Pension indicated in column 6 to be restored after 15 years from the date of commutation or 1st January 1986, whichever is later.			
	Para 4 (i)(a) (a)	Para 4 (i)(b) (b)	Para 4 (i)(c) (c)	Para 4 (i)(d) (d)	(a)	(b)	(c)	(d)
(5)	(6)				(7)			
Rs.131 or below	375	375	375	375	125	125	125	125
132	376	375	375	375	125	125	125	125
133	378	375	375	375	126	125	125	125
150	417	375	375	375	139	125	125	125
200	530	465	435	375	176	155	145	125
250	655	571	532	375	218	190	177	125
300	786	686	636	375	262	228	212	125
350	917	800	742	394	305	266	247	131
500	1,309	1,142	1,060	563	436	380	353	187

SPECIMEN

ANNEXURE-I— *contd.*

TABLE-III

Revision of basic pension with effect from 1st January 1996 for the purpose of working out revised restored amount of 1/3rd commuted portion of pension

Basic pension as on 31st December 1995 that would have been admissible as per orders contained in Government Resolution Finance Department, No. PCR 1087/426/SER-10 dated 19th August 1987 (as indicated in column 6 of Table II), provided absorbed employee had not opted for lumpsum payment on absorption.	Further consolidation of basic pension indicated in column 8 with effect from 1st January 1996 as per the orders contained in Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/303/SER-4, dated 15th November 1999	1/3rd commuted portion of revised basic pension indicated in column 9 to be restored after 15 years from the date of commutation or 1st January 1996, whichever is later
(8)	(9)	(10)
375	1,275	425
376	1,275	425
378	1,275	425
417	1,302	434
435	1,353	451
465	1,440	480
530	1,630	543
532	1,637	545
571	1,754	584
636	1,947	649
655	2,003	667
686	2,096	698
742	2,263	754
786	2,394	798
800	2,434	811
917	2,784	928
1,060	3,209	1,069
1,142	3,455	1,151
1,309	3,952	1,317

ANNEXURE-II

(As referred to in Para 2 of Government Resolution, Finance Department, No. COP/1099/306/SER-4, dated 15th November 1999)

The rates at which Dearness Relief was payable during the period from 1-4-85 to 1-1-86 on pension

1-4-85	117.50%
1-5-85	120.00%
1-8-85	122.50%
1-11-85	125.00%
1-1-86	127.50%

The rates at which Dearness Relief was payable during the period from 1-7-1986 to 1-1-1996 on pension upto Rs.1,750/-

1-7-86	4%
1-1-87	8%
1-7-87	13%
1-1-88	18%
1-7-88	23%
1-1-89	29%
1-7-89	34%
1-1-90	38%
1-7-90	43%
1-1-91	51%
1-7-91	60%
1-1-92	71%
1-7-92	83%
1-1-93	92%
1-7-93	97%
1-1-94	104%
1-7-94	114%
1-1-95	125%
1-7-95	136%
1-1-96	148%

The rates at which Dearness Relief is payable on pension with effect from 1-7-96 onwards.

1-7-96	4%
1-1-97	8%
1-7-97	13%
1-1-98	16%
1-7-98	22%
1-1-99	32%